आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक ०८ जून २०२५

ठळक बातम्या

- विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासासाठी रालोआ सरकारचं भरीव कार्य: पंतप्रधान नरेंद्र मोदी.
- जलसंवर्धनासाठी 'वॉटर ग्रीड' तयार करण्याची गरज असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विदर्भ पाणी परिषदेत प्रतिपादन.
- काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी सार्वजनिक मंचावरुन बोलण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा, असं केंद्रीय निवडणूक आयोगाचं आवाहन.
- वैद्यकीय मदतीच्या अर्जांवर नियमानुसार तत्काळ कार्यवाही करण्याचे नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचें जनसंवाद कार्यक्रमात निर्देश.

पंतप्रधान मोदी

विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून, गेल्या ११वर्षांत महिलांच्या विकासावरच रालोआ सरकारचं लक्ष केंद्रित असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने सुरू केलेल्या मुद्रा योजनेमुळे लाखो महिला उद्योजक बनू शकल्या आणि त्यांची स्वप्नं पूर्ण करू शकल्या, हेही त्यांनी आपल्या संदेशात अधोरेखित केलं. प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला गेला तसंच बेटी बचाओ, बेटी पढाओ सारख्या मोहिमांमुळे मुलींच्या सक्षमीकरणासाठी एक राष्ट्रीय चळवळ सुरू केल्याचंही त्यांनी म्हटलं. महिलांच्या नेतृत्वाखाली विकासाची व्याख्या तयार

करताना स्वच्छ भारत अभियान, जनधन खाती, उज्ज्वला योजनेद्वारे अनेक स्वयंपाक घरांना धूरमुक्त करणारा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

इज ऑफ लिविंग

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. त्यात आज, जीवनमान सुलभता- इज ऑफ लिविंग आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी.......

*गेल्या दशकात मध्यमवर्गीयांचे दैनंदिन जीवन सुधारणे हा प्रशासनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. गृहनिर्माण आणि आरोग्यसेवेपासून ते शहरी दळण वळण आणि डिजिटल ॲक्सेस पर्यंत, सरकारने मध्यमवर्गीयांचे जीवन सोपे, अधिक सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर बनवण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत, १.१६ कोटींहून अधिक घरं मंजूर करण्यात आली आहेत आणि जवळजवळ ९३ लाख घरं आधीच पूर्ण झाली आहेत किंवा हस्तांतरित करण्यात आली आहेत. स्मार्ट सिटीज मिशनने ७ हजार ५४५ मंजूर प्रकल्पांपैकी ९३ टक्क्यांहून अधिक प्रकल्प पूर्ण करून पायाभूत सुविधांमध्ये बदल घडवून आणला आहे. मेट्रो नेटवर्क एका दशकात चौपट झाले आहे, २०१४ मध्ये फक्त २४८ किलोमीटरवरून २०२५ मध्ये १,००० किलोमीटरहून अधिक झाले आहे. तर उडान योजनेने सामान्य लोकांसाठी हवाई प्रवास परवडणारा आणि सुलभ बनवला आहे, ८८ विमानतळांना ६२५ मार्गांनी जोडला आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जगातील सर्वात मोठ्या सार्वजनिक निधीतून निधी मिळवलेल्या आरोग्य हमी योजनांपैकी एक म्हणून उदयास आली आहे - ४१ कोटींहून अधिक आयुष्मान कार्ड जारी केले आहेत. एकत्रितपणे, हे उपक्रम भारतातील मध्यमवर्गीयांना अभिमानाने आणि आत्मविश्वासाने जगण्याची खात्री देतात.*

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

जलसंवर्धनासाठी 'वॉटर ग्रीड' तयार करण्याची गरज असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटल आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि

जनकल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वनामती सभागृहात ३ दिवसीय विदर्भ पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आयोजित कृषी जल परिषदेत मार्गदर्शन करत असतांना ते बोलत होते. विदर्भात शेतीची मोठ्या प्रमाणात उत्पादकता वाढवायची असेल तर जलसंवर्धन आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन आवश्यक असल्याचे गडकरी म्हणाले. विदर्भातील ६ जिल्ह्यात मागील काही काळात १० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्येचे अध्ययन करताना सिंचनाचा अभाव तसेच कापसाचे कमी उत्पादन मूल्य अशी दोन प्रमुख कारणे निदर्शनास आली. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असताना अकोला जिल्ह्यात कृषी विद्यापीठाच्या जमिनीवर शेततळे निर्माण केल्याने पूर्वी ३५० हेक्टर सिंचनाखाली असलेली जमीन १२०० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंत सिंचनाखाली आली. बुलढाणा ते अजिंठा दरम्यान रस्त्याचे काम करताना रस्त्याच्या बाजूला तलाव निर्माण करण्यात आले. पूर्वी पाणी नसल्याने इथले १७ हजार मेंढपाळ स्थलांतर करणार होते पण तलावातील पाण्यामुळे १७ हजार लोक आता गाव सोडत नसल्याचे गडकरी म्हणाले.

शेतकरी कल्याण

केंद्र सरकारला अकरा वर्षे पूर्ण झाली असून या अकरा वर्षात शेतकरी कल्याण साधण्याकरिता अनेक निर्णय घेतले गेले आहेत. केंद्र सरकारच्या पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेमुळे नागपुर जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांना खरीप हंगामात मोठा आधार मिळाला आहे. महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर असलेल्या रामटेक तालुक्यातील आदिवासी बहुल देवलापार, पिपरिया, सालई, सालेगाव सह इतर गावातील हजारो शेतकरी किसान सन्मान निधि योजनेमधून मिळालेला निधीचा वापर खरीप हंगामासाठी करीत असल्याचे दिसत आहे.यासंदर्भात अधिक माहिती देत आहेत पीपरीया गावाचे सरपंच प्रवीण उईके,

*या योजनेच्या माध्यमातून आम्हाला शेती उपयोगी युरिया म्हणा, सलफेट म्हणा किंवा शेती नांगरणी करीता ट्रॅक्टरच्या खर्चा वगैरे आम्हाला यातून भागवता येतो आणि कोणत्याही सावकाराकडे आम्हाला पैसे न मागता हे जे काही केंद्र सरकारने राज्य सरकार योजनाच्या माध्यमातून सरळ शेतकऱ्यांच्या डीबीडीच्या*

*माध्यमातून त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा होतात, अनुदानाच्या माध्यमातून, याचा शेतकऱ्याला खूप असा सहकार्य मिळतो, त्याबद्दल शासनाचे आभार. माझ्या मते तर ही पहिल्यांदाच केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना अनुदानाच्या माध्यमातून लाभ मिळत आहे. तर याच्या बऱ्यापैकी शेती करण्यास शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे.*

केंद्र सरकार पंतप्रधान सन्मान निधी योजनेतून शेतकऱ्यांना दरवर्षी **6** हजार रुपये आणि राज्य सरकार नमो शेतकरी महा सन्मान निधि योजनेतून **6** हजार रूपये असे एकुण **12** हजार रुपये शेतकऱ्यांना त्यांचा बँक खात्यात थेट दिले जात आहे.

राहुल गांधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सार्वजनिक मंचावरून निवडणूक प्रक्रियेविषयी आरोप करण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता, त्यावर निवडणूक आयोगानं हे आवाहन केलं. गांधी यांनी आपली तक्रार लिखित स्वरूपात द्यावी, तसंच प्रत्यक्ष येऊन भेटावं असं आयोगानं म्हटलं आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेसला १५ मे रोजी भेटीचं आमंत्रण दिलं होतं, मात्र त्यांनी ही भेट टाळली. गांधींचे आरोप इतके गंभीर आहेत मात्र ते तक्रार लिखित स्वरुपात देण्याचं टाळत आहेत, हे आश्चर्यजनक आहे, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

बावनकुळे जनसंवाद

वैद्यकीय मदतीसाठी शासनाकडे आलेले अर्ज संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ मार्गी लावावेत. नियमानुसार या अर्जावर तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले. तसेच जनसंवाद कार्यक्रमात बदल्याची निवेदने स्वीकारण्यात येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदर इथल्या जिल्हा नियोजन भवन इथं आज पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होते. या संवाद कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांना **256** टोकन वितरित करण्यात आली. आस्थेवाईकपणे पालकमंत्री

बावनकुळे यांनी निवेदनांचा स्वीकार करीत संबंधितांना कार्यवाहीचे निर्देश दिले. यात प्रामुख्याने वैद्यकीय मदतीचे अर्ज तत्काळ मार्गी लावावेत. जनसंवाद हा उपक्रम सर्वसामान्यांच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी आहे. त्यामुळे बदल्यांचे अर्ज प्रशासकीय मार्गानेच सोडवावेत, असे मंत्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.

सौरउर्जा

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून, प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात केलं. महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दीष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं

भारताची दहशतवादाविरोधी भूमिका स्पष्ट करण्यासाठी सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं जगातल्या विविध देशांना भेट देत आहेत. भाजपचे खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं काल बर्लिन इथं जर्मन सरकारच्या प्रतिनिधींची भेट घेतली. यावेळी त्यांनी भारताचं दहशतवादाविरोधातलं शून्य सहिष्णुता धोरण आणि सीमापार दहशतवादाचा सामना करण्याची रणनीती स्पष्ट केली. जर्मन सरकारच्या प्रतिनिधींनी दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायानं एकत्र येण्याची तातडीची गरज असल्याचं मत व्यक्त करत भारताच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला.

हवामान

हवामान!पुढील एका तासात नागपूर आणि यवतमाळ येथे विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून आज वर्धा चंद्रपूर तसेच अमरावती बुलढाणा येथे देखील पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे .दरम्यान सर्वात जास्त तापमानाची नोंद चंद्रपूर येथे **41** अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली**,** तर नागपूरचे तापमान **39** पूर्णांक **5** अंश सेल्सिअस होते.

****